माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
प्राप्त झालेले व्दितीय अपील
अपील क्रमांक : १९४५/२०१८

अपिलार्थी, श्री.बबनराव रुस्तमराव सनगाळे,
रा.तुळशी नगर, बुलडाणा, ता.जि.बुलडाणा

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक (मुख्या.),
पोलीस अधिक्षक कार्यालय, बुलडाणा, ता.जि.बुलडाणा

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक,
पोलीस अधिक्षक कार्यालय, बुलडाणा, ता.जि.बुलडाणा

व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०६.०६.२०२४

अपीलकर्ता : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित(प्रतिनिधी)
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित(प्रतिनिधी)

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०३.०२.२०१८ | ०६.०३.२०१८ व ११.०४.२०१८ | १५.०३.२०१८ | २७.०३.२०१८ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ०३.०२.२०१८** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " १.महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९/भाग-२/नियम १६१ नूसार शासकीय रक्कमेत अपहार झालेली रक्कम वसुल करण्यासाठी पोलीस अधिक्षक, बुलडाणा यांचे कार्यालयाकडून निघालेल्या आदेशाची सत्यप्रत, २.पोलीस अधिक्षक, बुलडाणा यांनी काढलेल्या आदेशावरुन सहायक पोलीस निरीक्षक श्री.भाऊसाहेब सातपुते यांचेकडून अपहाराची रक्कम वसुल झाल्याची ट्रेझरी किंवा पोलीस अधिक्षक कार्यालयाकडील भरणा केलेली रक्कमेची पावती " मागितलेली आहे. सदर माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत अपीलार्थीस दि.०६.०३.२०१८ रोजीचे पत्रान्वये, पोलीस निरीक्षक श्री.बी.बी.सातपुते यांच्याकडून शासकीय रक्कमेत अपहार झालेला नाही. त्यामुळे कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचे आदेश काढण्यात आलेले नाहीत. म्हणुन मुद्या क्र. १ व २ ची माहिती उलपब्ध नाही, असे लेखी सूचित केले. त्यानंतर अपिलार्थी यांनी व्यथित होवून **दिनांक १५.०३.२०१८ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती हेतूपूर्वक पुरविण्यात आली नसल्याने" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक



राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय अमरावती विभाग, अमरावती

२७.०३.२०१८ रोजी सुनावणी घेऊन "जन माहिती अधिकारी यांनी सदर माहितीची पुनश्च: खात्री करुन माहिती उलपब्ध असल्यास ७ दिवसात अपिलार्थीस पुरवावी व नसल्यास तसे कळावावे." असे नमूद करुन आदेश पारीत केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक १७.०७.२०१८ रोजी** " माहिती नाकारण्यात आली " असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक ०६.०६.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.देविदास बागडे हे उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.गणेश हिवरकर हे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपिलकर्ता श्री.सनगाळे यांनी दि.०३.०२.२०१८ रोजी सादर केलेल्या जोडपत्र-अ नूसार वरील प्रमाणे माहिती मागितली असता, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.०६.०३.२०१८ रोजी वरील दोन्ही मुद्यांची माहिती उपलब्ध नसल्याचे अपिलकर्ता यांना कळविण्यात आले. त्याविरुध्द अपिलार्थी श्री.सनगाळे यांनी दि.१५.०३.२०१८ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला. त्यावर दि.२७.०३.२०१८ रोजी सुनावणी घेण्यात आली. जन माहिती अधिकारी यांना सदर माहितीची पुनश्च: खात्री करुन माहिती उपलब्ध असल्यास ७ दिवसात अपिलार्थी यांना पुरवावी व नसल्यास तसे कळवावे, असे नमूद करीत आदेश पारित केले. यावर अपिलकर्ता यांनी तिव्र आक्षेप नोंदविला असून, मागितलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी श्री.सातपुते यांचे कथीत अवैध प्रवास भत्त्या संबंधि व त्यांच्यावर लादण्यात आलेली दंड रक्कमेविषयी असून दिलेली माहिती ही खोटी व दिशाभूल करणारी असून, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशाचे अनुषंगाने श्री.सातपुते यांनी दि.२१.०४.२०१८ रोजी कार्यालय अधिक्षक यांचेकडून प्रकरणाची पुनश्च: पडताळणी करुन माहितीचे उपलब्धतेबाबत खात्री करुन घेता माहिती उपलब्ध नाही, असे समजले त्यामुळे माहिती पुरविता येत नाही, असा प्रतिसाद दिलेला आहे. अपिलार्थी श्री.सनगाळे यांचे म्हणण्यानूसार यापुर्वी दि.०१.०६.२०१३ रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जात तत्कालीन सहायक पोलीस अधिक्षक श्री.सातपुते व नायब पोलीस कॉन्स्टेबल श्री. गायकवाड यांनी दि.०४.०७.२०११ रोजीचे प्रवास भत्ता बिल चुकीचे प्रदान करण्यात आले असून, तत्कालीन पोलीस अधिक्षक, बुलडाणा यांच्या आदेशात वरील दोन्ही अधिकारी/कर्मचारी यांचेवर मुंबई पोलीस (शिक्षा व अपीले) नियम १९५६ मधील नियम ३(२)(४) अन्वये रुपये पाचशे दंडाची शिक्षा करण्यात आली असून, तसेच आठवडा डायरी व प्रवास भत्ता बिल यामध्ये तफावत असल्याचे सुस्पष्ट निष्कर्ष काढण्यात आले असल्याची वस्तुस्थिती आढळून येते. ही बाब लक्षात घेता, अपिलार्थी यांना उपरोक्त माहिती पोलीस अधिक्षक कार्यालय येथूनच कळविण्यात आली असून, प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध नसल्याबाबत दिलेला प्रतिसाद हा प्रथमदर्शनी चुकीचा व दिशाभूल करणारा असल्याचे स्पष्टपणे आढळून येते. ही बाब लक्षात घेता, तत्कालीन जन माहिती अधिकारी, तत्कालीन सहायक जन माहिती अधिकारी यांनी याबाबतीत दिलेला प्रतिसाद हा उपलब्ध असलेल्या



राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय अमरावती विभाग, अमरावती

माहितीशी विसंगत असल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. ही बाब लक्षात घेता, वरील जोडपत्र-क संपूर्णपणे मान्य करित अपिलार्थी यांना पोलीस अधिक्षक, बुलडाणा कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती तत्काळ प्रदान करण्यात यावी तसेच दिलेली माहिती विसंगत, जाणून बुजुन दिशाभूल करणारी असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होत असल्याने तत्कालीन जन माहिती अधिकारी व सहायक जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द कलम १९ (८) (ग) व २० (१) अन्वये अधिकतम शास्ती का करण्यात येवू नये? याचा स्वयंस्पष्ट खुलासा वरील आदेश प्राप्त होताच दोन आठवड्याच्या आत आयोगास सादर करावा.

अंतरिम आदेश

१. **अपिलकर्ता यांचा द्वितीय अपील अर्ज मान्य करण्यात येत आहे.**
२. **विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी वरील आदेशानूसार कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस तात्काळ व विनामुल्य प्रदान करावी.**
३. **वरील विवेचनानूसार तत्कालीन जन माहिती अधिकारी व सहायक जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रदान केलेली माहिती ही विसंगत व जाणून बुजुन दिशाभूल करणारी दिली असल्याचे सुनावणी दरम्यान स्पष्ट झाले आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द कलम १९ (८) (ग) व २० (१) नूसार अधिकतम शास्तीची कार्यवाही का करण्यात येवू नये ? याबाबतचा स्वयंस्पष्ट लेखी खुलासा प्रस्तुत आदेश प्राप्त झाल्यापासून दोन आठवड्याच्या आत आयोगास सादर करावा. जर दोन आठवड्याच्या आत खुलासा सादर न केल्यास त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन एकतर्फी निर्णय देण्यात येईल, याबाबत नोंद घ्यावी.**
४. **विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रस्तुत आदेशाची एक प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी व सहायक जन माहिती अधिकारी यांना देवून त्याची पोच आयोगास सादर करावी.**

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय अमरावती विभाग, अमरावती

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ अमरावती

ठिकाण : अमरावती
दिनांक : ०६.०६.२०२४

जावक क्रमांक ५०२७ दिनांक 15 JUL 2024

निर्गमित केले
15 JUL 2024

Vishal D.Ingale-२०२४/